९) सुलभ शौचालयातील व्यवस्था सुस्थितीत आहे किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी विभागीय अभियंता यांची राहील व व्यवस्थेतील त्रुटी व दोष आढळून आल्यास मे. सुलभ शौचालय यांचे बरोबर झालेल्या करारातील अटीनुसार त्याबाबतीतील उपाय योजना करण्याबाबत कार्यवाही करण्याची जबाबदारी विभागीय अभियंता यांची राहील.

१०) बसस्थानकाच्या परीसरात स्वच्छता गृहाबाहेरील परिसर किंवा बसस्थानकाचेरील परिसरात रात्रीच्या वेळी प्रवाशांना नैसर्गिक विधी करण्यास प्रतिबंध करण्याबाबत योग्य ती जबरदारीच्या उपाय योजना कराव्यात.

११) ज्या बसस्थानकाला रंग रंगोटी करण्यात आलेली नाही व करण्याची आवश्यकता आहे अशा बसस्थानकाला व्हाईट वॉश देण्यात यावा व बस स्थानक सुशोभित अवस्थेत ठेवण्यात यावे. यासाठी संपूर्ण जबाबदारी विभागीय अभियंता यांची राहील.

१२) स्वच्छता गृहामध्ये २४ तास स्वच्छता राखण्याची जबाबदारी स्थानक प्रमुखांची राहील.

पिण्याच्या पाण्याची व्यवस्था.

१) ज्या ठिकाणी पाण्याचे दूषित (खारपट) आहे अशा ठिकाणी पाणी पुरवठा करण्याचे दृष्टीने प्रचलित नियमानुसार विभागीय अभियंता सर्व ती कार्यवाही करतील. तसेच अस्तित्वात असलेल्या विहीरीमध्ये पाणी नसेल तर त्या विहीरीतील गाळ काढणे, बोअर घेणे इत्यादी कार्यवाही विभागीय अभियंता यांचेकडून करतील. जेणे करुन पाण्याचा मुबलक पुरवठा उपलब्ध होऊ शकेल.

२) ज्या ठिकाणी पाणी पुरवठा करणे आवश्यक आहे त्या ठिकाणी दूसरे पाणी पुरवठा करण्यात यावा व आवश्यकता जो अर्थ होईल तो लोकल फंडाने विभाग नियंत्रक मंजूर करतील. तसेच मुबलक पाणी पुरवठा असेल तर स्थानिक संस्थाकडून जादा पाणी पुरवण्याची व्यवस्था विभागीय अभियंता यांचेकडून करतील.

३) उपलब्ध झालेल्या पाण्याची योग्य ती साठवणूक करुन घेण्यासाठी सिमेंटेड टाक्या आवश्यकतेनुसार विभागीय अभियंता यांनी उपलब्ध करुन द्याव्यात. या करिता येणा-या अर्थास विभाग नियंत्रक मंजूरी देतील.

४) विभागीय अभियंता पिण्याचे पाणी स्वच्छ व शुध्द प्रवाशांना उपलब्ध करुन देण्यासाठी योग्य ती जबरदारी घेतील. उदा. पिण्याच्या पाण्याची टाकी आठवडयातून निश्चित वेळा दिवस ठरवून आतून बाहेरुन स्वच्छ करुन घेतील, तसेच टाकीच्या आजूबाजूचा परिसर ही नैसर्गिक स्वच्छ ठेवण्याबाबत काळजी घेतील तसेच साठलेले पाणी जंतू विरहीत राहण्यासाठी क्लोरीन पावडर, मोटे-पिएम परमॅगनेट यांचा वापर करतील.

५) विभाग नियंत्रक यांनी धार्मादाय संस्था वा दानशूर व्यक्ती यांचेकडून रा.प. बसस्थानकावर पानपोई सुरु करण्याबाबत किंवा वॉटर कूलर उपलब्ध करुन घेण्याबाबत प्रयत्नशील राहून तसे करण्याबाबत उद्युक्त करावे व वॉटर कूलर उपलब्ध करुन दिल्यानंतर त्यासाठी आवश्यक व्यवस्थापक योग्य ती जागा ठरवून देतील व वॉटर कूलर कार्यान्वित पुढील संपूर्ण देखभाल करतील. उदा. विद्युत पुरवठा करणे, दुरुस्ती इत्यादी करुन घेण्याची जबाबदारी घेतील.

.....४ .....